महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहिर सूचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संवसु मंडळ कार्यालय, बुलढाणा अंतर्गत सन 2026-27 करीता एकुण 129 पदे भरण्याकरिता पात्र शिकाऊ उमेदवाराची निवड समितीद्वारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येणार आहे. त्याकरीता पात्र शिकाऊ उमेदवारांनी **जाहीरात प्रकाशित झाल्यापासून ते दि. 30.03.2026 चे सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज करावा. अर्ज भरतांना Apprentice Profile पुर्ण करणे आवश्यक आहे. सदर फॉर्म भरल्यानंतर Form Print काढुन त्यासोबत 1)ITI (संपुर्ण सत्राचे/वर्षाचे गुणपत्रक/प्रमाणपत्र. 2) इ.10 वी गुणपत्रक/प्रमाणपत्र. 3) आधाराकार्ड 4) रहीवासी पुरावा (LC Domocile) 5)जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारासाठी) 6) बँक पास बुक 7) Online भरलेला फॉर्म इत्यादी छायांकित प्रतीत बुलढाणा मंडळ कार्यालयात **दि.30.03.2026 संध्याकाळी 05.30** वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | आस्थापनेचे नांव | आस्थापना नोंदणी क्रमांक | वीजतंत्री | तारतंत्री | कोपा | संबंधित आस्थापनाचे भ्रमणध्वनि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बुलढाणा मंडळ अंतर्गत (बुलढाणा/ खामगांव/ मलकापुर/ मेहकर विभाग) | E11162701135 | 57 | 54 | 18 | 9511712035 |

**अटी व शर्ती -** 1) शिकाऊ उमेदवारांचे वय किमान 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. **दि.01.03.2026** पर्यंत 18 ते 30 वर्ष व मागासवर्गीयांसाठी 5 वर्ष शिथील राहील. 2) सदर उमेदवार हा बुलढाणा जिल्हयातील रहिवासी असावा.

3) **शैक्षणिक पात्रता : अ)** महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त (10+2) व बुलढाणा जिल्ह्यातील शासनमान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन (कोपा, वीजतंत्री व तारतंत्री व्यवसाय) मागास प्रवर्गातील (अ.ज. व अ.जा. करिता) उमेदवारांकरिता **55%** गुण व उर्वरित प्रवर्गाकरिता किमान 60% गुण मिळवुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. 4) मागासवर्गिय उमेदवारांची निवड भारतीय शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार करण्यात येईल त्यांकरिता उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. 5) उमेदवाराने **www.apprenticeshipindia.gov.** in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. 6) कोपा, वीजतंत्री व तारतंत्री या संवर्गाचा प्रशिक्षण कालावधी एक वर्षाकरिता राहिल. 7)प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना शासकीय नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. 8) उमेदवारांची **Profile** परिपुर्ण असणे आवश्यक आहे तसेच आधारकार्ड व **Profile** वरील माहिती सारखी असावी. अपुर्ण **Profile** असणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. 9) शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती करिता 1:10 व अनुसूचित जमाती करिता 1:11 प्रमाणानुसार पदे राखीव व महिलांकरीता पदे राखीव राहील. 10) निवड झालेल्या पात्र उमेदवारांना बुलढाणा मंडळ कार्यालय अंतर्गत असलेल्या बुलढाणा/ खामगांव/ मलकापुर व मेहकर विभागीय कार्यालयातील शाखा कार्यालयामध्ये प्रशिक्षण कालावधी पुर्ण करण्याकरीता देण्यात आलेल्या ठिकाणीच प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील. 11) निवड झालेल्या पात्र उमेदवाराने सोबत येतांना आपली सर्व मुळ कागदपत्रे व त्यांची साक्षांकित दोन छायाप्रती सोबत आणावी. 12) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. 13) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतःबदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**सक्षम अधिकाऱ्यांचे नाव व कार्यालयाचे नाव पत्ता आदी तपशील पुढीलप्रमाणे :-**

अधिक्षक अभियंता, महावितरण मंडळ कार्यालय, विद्युत भवन, चिखली रोड, बुलढाणा.

**अधीक्षक अभियंता, संवसु मंडळ,**
**महावितरण, बुलढाणा**

PRO No. :- 32/Dt.10.03.2026.